**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. एस.व्ही.देशमुख</u>**

**०४.** प्रतिवादी क्र. ०५ चाकुर येथे राहते. प्र.वा.क्र. ०३ पुणे येथे राहत असुन प्र.वा.क्र. ०४ लातूर येथे राहतो. मी गट नं. १४४ चा ७/१२ पाहिला आहे. दावा मिळकत गट क्र. १४४ मध्ये वादीच्या नावे १ हे. २३ आर इतके क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या नावे १ हे. २३ आर क्षेत्राचा अमल ७/१२ ला सन १९९३ च्या पुर्वीपासुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, विठल जाजुर्णे हे सर्वे नं. २५ चे ४ हे ४७ आर चे मालक होते. आमचे गावात जमीन एकत्रीकरण व मोजणी सन १९८५ साली झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, विठठल जाजुर्णे यांना नामदेव नावाचा एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्र.वा.क्र. ०१ चे वडील हे नामदेव आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विठल जाजुर्णे मयत झाल्यानंतर त्यांचा मुलगा नामदेव याचे नावे सर्वे नं. २५ मधील ११ एकर १ गुंठा नावे आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं. २५ चे एकत्रीकरणानंतर गट क्र. १४४ व गट क्र. १४५ पडले. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीकरणानंतर गट क्र. १४४ मधील १ हे. २३ आर व गट क्र. १४५ मध्ये ४ हे. ७२ आर इतकी जमीन आली.

**०५.** प्र.वा.क्र. ०१ सिध्देश्वर याच्या आईचे नाव कौशल्याबाई असे आहे. हे म्ह णणे खरे आहे की, कौशल्याबाई व वादीच्या वडीलामध्ये रस्त्यावरुन वाद होता. या वादामध्ये तडजोड झाल्याचे मला माहिती आहे. गट क्र. १४५ मधील क्षेत्र आज रोजी कोणाच्या नावे किती आहे हे मला सांगता येणार नाही. मला गट क्र. १४५ मध्ये कोणत्या प्रतिवादीचे नावे किती क्षेत्र आहे हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्र.वा.क्र. ०१ ने वादीकडे गट क्र. १४४ व गट क्र. १४६ चे बांधावरुन रस्ता मागितला होता. हे म्हणणे खरे आहे की, तहसीलदार यांनी प्रतिवादींना रस्ता दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीकरणाच्या मोजणीला मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, एकत्रीकरणाच्या वेळी संबंधीत मोजणीदाराने कशी मोजणी केली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वादी सोबत चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे प्रतिवादीसोबत चांगले संबंध नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीसोबत चांगले संबंध नसल्यामुळे खोटी साक्ष देत आहेत.

उलटतपास पूर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-
**( आर.डी. वाबळे )**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदपूर.

स्थळ - अहमदपूर.
दिनांक- ०३.०७.२०२५